# पत्रकार राजू परुळेकर हा घरचा भेदी !

# अण्णा संतप्त ! ब्लॉग बंद

नवी दिल्ली, दि. ५ - मौनव्रत काळात अण्णा हजारे यांच्या मनोगत प्रसिद्धीचे काम पाहणारे ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर हे घरचा भेदी असल्याचा घणाघात खुद्द अण्णा हजारे यांनी आज केला. राजू परुळेकरांनी ब्लॉकचा दुरुपयोग केल्याचा ठपका ठेवत अण्णांनी ब्लॉग बंद करण्याची घोषणाही करून टाकली.



राजू परुळेकर अण्णा हजारे

अण्णांच्या मौनव्रत काळात पत्रकार राजू परुळेकर हे अण्णांचे प्रसिद्धी सहायक म्हणून काम करत होते. याबाबत काल नवी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत अण्णा हजारे यांनी राजू हा काही माझा पगारी नोकर नाही, त्याने ब्लॉगवर टाकलेला मजकूर तपासला जाईल, असे विधान केले होते. त्यामुळे राजू परुळेकर हे नाराज झाले. मी अण्णांच्या सहमतीशिवाय ब्लॉगवर काहीही टाकलेले नाही, असा खुलासा राजू परुळेकर यांनी दिला. त्याचवेळी आज राजू परुळेकर यांनी अण्णांचे एक पत्र ब्लॉगवर टाकले. त्या पत्रात अण्णा टीमची फेररचना करण्याचा विचार अण्णांनी व्यक्त केला होता. सदर पत्र प्रसिद्ध न करण्यासाठी माझ्यावर अण्णांचे सहकारी सुरेश पाठारे यांनी दबाव टाकला होता, असेही राजू परुळेकरांनी पत्रकारांना सांगितले. त्यामुळे अण्णावर्तुळात खळबळ उडाली.

त्यावर आज अण्णांनी पत्रकार परिषद घेतली. माझ्या सहीशिवाय प्रसिद्ध झालेला मजकूर हा मी लिहिलेला असता तरी ग्राह्य मानता येणार नाही. टीम अण्णाच्या फेररचनेबाबत मी निर्णय घेतला नव्हता. ब्लॉगवर असे काही घडेल, याची मला कल्पना नव्हती. अण्णा टीमला बदनाम करण्यासाठी हे षड्यंत्र चालू असल्याचे मला वाटते. मी हा ब्लॉगच बंद करून टाकत आहे.

दरम्यान, या पत्रकार परिषदेनंतर एका खाजगी टीव्ही वाहिनीशी बोलताना अण्णा हजारे म्हणाले की, राजूचे वर्तन हे घरचा भेदीसारखे आहे. त्याच्याकडून माझी अशी अपेक्षा नव्हती.